**स्पेशल केस नं.३१/ २०२३**

**निशाणी ५८**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ याची जबानी**

**मी, सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,**

| | |
|---|---|
| माझे नांव | -तुकाराम नारायण तांबे |
| वय | -६१वर्ष |
| व्यवसाय | - सेवानिवृत्त, |
| राहणार | -साकेगांव ता. पाथर्डी जि. अहमदनगर |

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सी.डी.कुलकर्णी वकील**

१. मी सन २०१९ ते मे २०२२ पर्यत पाथर्डी पोलीस स्टेशनला कार्यरत होतो. गु.र. नं. २७४/२०२० हा गुन्हा दि. १५.०५.२०२० रोजी ठाणे अंमलदार यांचे आदेशाने पुढील तपासासाठी माझेकडे देण्यात आला. सदर आदेश मला दाखविला. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यांस **निशाणी ५९** देण्यात येत आहे. सदर आदेश सोबत फिर्याद, दैनिक अहवाल प्रत व फिर्यादीचे अंपगत्व प्रमाणपत्र ची प्रत मला मिळाली होती. त्यानंतर मी घटनास्थळावर जावुन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. मला निशाणी ४५ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविला. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर सातबारा उतारा हस्तगत केला. त्याचे अवलोकन केले. सदर सात बारा उता-यास **निशाणी ६०** देण्यात येत आहे. त्यानंतर आरोपींना नोटीस दिली. त्यानंतर जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. पुर्ण तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. तपासामध्ये मला असे निष्पन्न झाले की, आरोपींनी फिर्यादी अपंग असतानाही त्यांना आडवे होवुन गाडीवरुन खाली पाडुन लाथा बुक्याने मारहाण केली तसेच साक्षीदार योगेश हा सोडविणेसाठी गेला असता त्यास आरोपी नं. २ याने शिवीगाळ करुन त्याच्या उजव्या हाताला चावा घेतला. मी आरोपींना ओळखतो.

आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण

<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री. आर.पी.शेलोत वकील</u>

२. हे म्हणणे खरे आहे की,ज्यावेळी माझे कडे फिर्याद आली त्यावेळी फिर्याद मध्ये असे नमुद नव्हते की, आरोपी अनिकेत याने योगेश याचे हाताला चावा घेतला. आरोपी अनिकेत याने योगेश याच्या हाताला चावा घेतला ही बाब फिर्यादीच्या पुरवणी जबाबात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद घेतल्या नंतर दुस-या दिवशी पुरवणी जबाब घेतला. मी योगेश गायाकवाड याच्या हाताची जखम पाहिली. सदर जखम उजव्या हाताला होती की डावे हाताला होती हे आता मला आठवत नाही. दैनिक अहवाल पोलीस ठाणे अंमलदार यांनी पाठविला होता. दि. १५.०५.२०२० रोजी मी रात्री ८ ते ८.३० वाजता पोलीस स्टेशनला हजर होतो. सदर गुन्हा सायंकाळी सात वाजुन सतरा मिनीटांनी दाखल झाला. मी सायंकाळी ८ ते ८.३० दरम्यान पोलीस स्टेशनला हजेरी साठी आलो असता मला निशाणी ५९ वरील आदेश मिळाला. त्या दिवशी फिर्यादी किंवा जखमी यांची भेट झाली नाही. दुस-या दिवशी मी घटनास्थळावर गेलो. फिर्यादीशी फोनवर संपर्क करुन हनुमान टाकळी येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्या वरील पंच फिर्यादीचे नातेवाईक आहेत. त्यानंतर रात्री ८ वाजता पाथर्डी पोलीस स्टेशनला आलो.

३. हे मला आठवत नाही की, १६.०५.२०२० रोजी मी केलेल्या कामाची नोंद पोलीस स्टेशन डायरीला केली किंवा नाही. साक्षीदारांचे जबाब मी पोलीस स्टेशनला नोंदविले. फिर्यादीचा पुरवणी जबाब पोलीस स्टेशनलाच नोंदविला. हे म्हणणे खरे आहे की, ज्या गोष्टी फिर्यादीने फिर्याद मध्ये सांगितल्या नाही त्या गोष्टी पुरवणी जबाबात सांगितल्या. हे म्हणणे खरे आहे की,मुळ

फिर्याद मध्ये " लंगडया " हा शब्द नसुन तो पुरवणी जबाबात आहे. हे म्हणणे खरे आहे की, कु-हाडीने जिवे मारण्याची धमकी दिली, ही बाब मुळ फिर्याद मध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी अनिकेत गायाकवाड याने योगेश यांस धक्काबुक्की करुन त्याच्या डावे हातास चावा घेतला, ही बाब मुळ फिर्याद मध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपचार घेतले ही बाब फिर्याद मध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेचे गांभीर्य वाढावे म्हणुन फिर्यादीने या सर्व गोष्टी पुरवणी जबाबाने वाढविलेल्या आहे.

४. साक्षीदार अण्णासाहेब दगडखैर हा विट भटटी चालवितो हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांचे जबाब मी स्वतः घेतलेले नाही. फिर्यादी, आरोपी,साक्षीदार यांच्यात पाथर्डी न्यायालयात दावे चालु असले बाबत मी चौकशी केली नाही. त्यांचे मध्ये रस्त्यावरुन तहसिलदार यांचेकडे वाद चालु असलेबाबत मी चौकशी केली नाही. हे मला सांगता येणार नाही की, घटनेच्या वेळी आरोपी अनिकेत हो तीसगांव येथील रेणुका माता मल्टीस्टेट बँकेत नोकरी करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी अनिकेत हा घटनेच्या वेळी घटनास्थळावर नव्हता.

५. साक्षीदार विष्णु गायाकवाड यांनी जबाब देताना सांगितले नव्हते की, आरोपी फिर्यादीला असे म्हणाले की," लंगडया दुसरे तंगडे मोडील ". हे म्हणणे खरे आहे की, जखमींना तपासणे साठी मी डॉक्टरांना पत्र दिले नव्हते. हे मला सांगता येणार नाही की, आरोपींकडे मोबाईल फोन आहेत. आरोपींना नोटीस देण्यापुर्वी त्यांचे घरी जावुन समक्ष सांगितले. हे मला आठवत नाही की, आरोपींचे अटक पंचनाम्या मध्ये त्यांचे मोबाईल नंबर लिहलेले आहे. घटनेच्या दिवशीचे आरोपी अनिकेत चे मोबाईल लोकेशन शोधलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा स्वतः हुन मोटरसायकल वरुन पडुन जखमी झाला व त्याचा गैरफायदा घेवुन त्याने खोटी फिर्याद दिली व त्याचा मी चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, तपासा

**निशाणी ५८**

मध्ये मला असे निष्पन्न झाले की,आरोपींनी फिर्यादी अपंग असतानाही त्यांना आडवे होवुन गाडीवरुन खाली पाडुन लाथा बुक्याने मारहाण केली तसेच साक्षीदार योगेश हा सोडविणेसाठी गेला असता त्यास आरोपी नं. २ याने शिवीगाळ करुन त्याच्या उजव्या हाताला चावा घेतला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास पुर्ण .

श्रवणोत्तर स्विकृती,

दिनांक १७/०२/२०२६                    (आर डी चव्हाण )
अहमदनगर                    अति सत्र न्यायाधीश अहमदनगर